
# पालि-पवेसिका

(संयुक्त अभ्यासक्रमासाठी)

## इयत्ता आठवी



अत्त दीप भव।

सच्चमेव जयते।

पञ्ञावन्ता सब्बत्थ पूजीता।

सब्बे अवेरा होन्तु।

विज्जादानं सब्बदानं जिनाति।

सीलवतो सब्बत्थ सुकित्ती होति।

जलं जीवनं होति।

रुक्खो मानवस्स पिय्यमित्तो।

सन्तुठ्ठी परमंधनं।

विज्जा च विनयो च साभिमान च- एता मम गुरु।

विस्सास परमा ञाती।

आरोग्य परमा लाभा।

रुक्खा सप्पुरिसा इव होन्ति।

होतु मे जयमङ्गलं।

निब्बाणं परमं सुखं।

सब्बे सत्ता सुखी होन्तु।

भवतु सब्ब मङ्गलं।

शिक्षण खात्याचा मंजुरी क्रमांक :
प्राशिसं/२००९–२०१०/मंजुरी/५०५(३२)/१४४४ दि. २६.३.२००९

# पालि पवेसिका

## (संयुक्त अभ्यासक्रमासाठी)

## इयत्ता आठवी

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
पुणे ४११००४

| | | |
|---|---|---|
| प्रथमावृत्ती : २००९<br>पुनर्मुद्रण : २०१० | : | © महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे-४११००४.<br>या पुस्तकाचे सर्व हक्क महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे राहतील. या पुस्तकातील कोणताही भाग संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, यांच्या लेखी परवानगीशिवाय उद्धृत करता येणार नाही. |
| संपादक मंडळ | : | श्री. केशव मोतीराम भगत<br>श्री. चंद्रमणी खेमराज बागडे<br>श्री. पंजाब सदाशिवराव प्रधान<br>श्री. माधव राजगुरू, समन्वयक |
| संयोजन प्रमुख | : | श्री. माधव राजगुरू, विशेषाधिकारी-मराठी, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे-४. |
| संयोजन सहायक | : | श्रीमती उषादेवी प्रताप देशमुख, विषय सहायक मराठी, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे-४. |
| चित्रकार | : | श्री. श्रीमंत होनराव |
| निर्मिती | : | सच्चिदानंद आफळे, मुख्य निर्मिती अधिकारी<br>संजय कांबळे, निर्मिती अधिकारी<br>संदीप आजगांवकर, निर्मिती सहायक |
| फोटोटाईपसेटिंग | : | सौ. विद्या खुर्जेकर, मॅक-स्क्रिप्ट, १०-आसावरी, औंध, पुणे-४११००७ |
| कागद | : | ७० जी.एस.एम्., क्रीमवोव्ह |
| मुद्रक | : | Quality Printers (I) Worli, Mumbai - 18. |
| मुद्रणादेश क्रमांक | : | N/PB/2010-11 (5,000) |
| प्रकाशक | : | विवेक गोसावी, नियंत्रक,<br>पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ,<br>प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५. |

# भारतस्स संविधानं उद्देसिका

मयं, भारतस्स लोका, भारतस्स एको सब्बसत्ता स्वायत्तं
समाजवादी धम्मनिरपेक्ख लोकसाही गणरज्जं
घटितुं तस्स च सब्बे नागरिकानं;
सामाजिक, वित्तीय, च राजनेत्तिक ञायं;
विचार, अभिव्यक्ती, विस्सास सद्धा
उपासना च तेसं स्वातंत्तं;
सन्धीस्स दज्जाय समानता;
पटिविदितं पापेतुं दस्सनाय
तस्मिं सब्बेस्मिं अत्तस्स पतिट्ठा, च
भारतस्स एकता एकात्मता च
तेसं अभिवचनं दाता बन्धूता
पवड्ढितुं सङ्कप्पपुब्बकं सम्मासङ्कप्पंकत्वान;
अम्हाकं संविधान सभास्मिं
अज्ज सव्वीसति दिने नोहेम्बर मासे,
एकूनविंसति एकूनपञ्ञासतिमे वस्से
इदं मज्झमेन अयं संविधानं समादियित्वा च
अधिनियमितं कत्वान सयंपटि अम्हे समप्पयाम ।

# पटिञ्ञा

भारतो मम देसो ।

सब्बे च भारतीया मम बान्धवा ।

अत्थि देसविसये मे पेमं ।

मम देसस्स या समिद्धता,
या च विविधताय मण्डिता परम्परा, तस्साहं मानी ।

एतं दायज्जं उपसम्पादेतुं अहं दळहपरक्कमो भविस्सामि ।

मातापितुन्नं आचरिय-पाचरियानं वयो-अनुप्पत्तानं अहं सक्करिस्सामि ।

सब्बे जने अहं सोरताय पटिपज्जिस्सामि ।

अहं देसविसये देसबान्धवविसये च दळहभत्तिं पटिजानामि ।

यं तेसं कल्याणं तं एव होतु मे कल्याणं,
या तेसं समिद्धि सा मे समिद्धि,
यं तेसं सुखं तं मे सुखं ।

# प्रस्तावना

'महाराष्ट्र राज्य उच्च प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २००४' नुसार पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाने 'पालि-पवेसिका' इयत्ता आठवीसाठी हे पुस्तक तयार केले आहे. इयत्ता आठवीपासून द्वितीय भाषा गटात एक वैकल्पिक भाषा म्हणून पाली भाषा शिकण्याची एक चांगली संधी या पाठ्यपुस्तकाद्वारे विद्यार्थ्यांस मिळाली आहे.

पाली भाषा शिकण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांचे पहिलेच वर्ष असले, तरी इ. ८वीच्या विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता लक्षात घेऊन यामध्ये गद्य व पद्य या पाठांची सहज समजेल अशी रचना करण्यात आली आहे. काही पाठ मूळ 'पालित्रिपिटक' साहित्यातून घेतले आहेत, तर काही पाठांची नव्याने रचना केलेली आहे. गद्य पाठांमध्ये कालानुरूप नवीन विषयांचा समावेश केला आहे. त्याचबरोबर पालिभाषेतील खास वैशिष्ट्यांचा परिचय करून देण्यासाठी काही प्राचीन गोष्टींचाही अंतर्भाव केलेला आहे. धम्मपदातील निवडक गाथा, त्या गाथांची गेयता, अर्थ आणि भावार्थ, शब्दसौंदर्य, उपमा व माधुर्य वैशिष्ट्यपूर्ण आहे, त्यामुळे विद्यार्थ्याला गद्य-पद्य पाठांच्या अभ्यासाने पालिभाषेची अधिक आवड निर्माण होईल, पाठ्यपुस्तकाच्या वैशिष्ट्यपूर्ण अंतरंगाचा विचार करता आतील गद्य-पद्य पाठांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची पालिभाषेसंबंधीची अभिरुची व आत्मीयता वाढीस लागेल. प्रत्येक पाठात अनुरूप असलेली सुंदर चित्रे, शब्दार्थ, तळटीपा व स्वाध्याय दिल्यामुळे पाठ्यविषय विद्यार्थ्यांना सहज समजेल अशी आशा आहे.

तसेच पाठ्यपुस्तकात व्याकरणाची परिशिष्टे दिली असून क्लिष्टता टाळून ते अवघड वाटणार नाही असा आवश्यक तेवढाच व्याकरणाचा भाग समाविष्ट केलेला आहे.

प्रस्तुत पाठ्यपुस्तक तयार करण्याच्या कामी पालिभाषा विषय संपादक मंडळाचे सदस्य, चित्रकार या सर्वांनी आत्मीयतेने परिश्रम घेऊन पाठ्यपुस्तक तयार केले आहे. पालिभाषेचे शिक्षक, तज्ज्ञ यांच्याकडून या पुस्तकाचे समीक्षण करून घेण्यात आले. समीक्षकांच्या सूचना व अभिप्राय यांचा विचार करून या पुस्तकाला अंतिम स्वरूप दिले आहे.

विद्यार्थी, पालक, शिक्षक या पुस्तकाचे स्वागत करतील अशी आशा आहे.

(श्री. विवेक गोसावी)
प्र. संचालक
पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे-४

पुणे
दिनांक : ३१ मार्च, २००९
चैत्र शु. ५, १९३१

# पाठानुक्कमो


| गज्ज पाठो । | | पुट्ठ क्रमांको |
|---|---|---|
| १. बालको बालका । | ... | १ |
| २. अहं आचरियं नमामि । | ... | ४ |
| ३. आचरियो च बालको च । | ... | ६ |
| ४. मम पाठसाला । | ... | ८ |
| ५. उय्यानं । | ... | १० |
| ६. नीलं गगनं । | ... | १२ |
| ७. तुम्हेहि दिट्ठं एकं गामं । | ... | १५ |
| ८. सीलवतो आनिसंसा । | ... | १७ |
| ९. अङ्कुत्तरसङ्गहो । | ... | २० |
| १०. बालं न सेवे | ... | २४ |
| ११. बिम्बिसारो च सिद्धत्थो च । | ... | २७ |
| पज्जपाठो | | |
| १. सुजाता थेरी । | ... | ३० |
| २. मातङ्ग चरियं । | ... | ३३ |
| ३. काया वाचा तथा मनसा संवरो । (पाठांतरासाठी) | ... | ३५ |
| ४. धम्मपदगाथासङ्गहो । | ... | ३७ |
| ५. परिशिष्टे १ते ७ | | ४० |

# पाली भाषेविषयी थोडक्यात माहिती

पालिभाषा ही एक प्राचीन भारतीय भाषा असून ती वाङ्मयीनदृष्ट्या समृद्ध भाषा आहे. इ.स.पू. सहाव्या शतकात मगध, कोसल इत्यादी प्रांतांमध्ये गौतम बुद्धांनी लोकभाषा म्हणून या पाली भाषेतच जनतेला धम्मोपदेश केला. त्यांनी केलेला हा उपदेश पाली त्रिपिटकात (त्रिपिटक म्हणजे तीन पेटारे - १. सुत्तपिटक, २. विनयपिटक ३. अभिधम्मपिटक) यामध्ये संग्रहित करण्यात आला आहे आणि विविध धम्म-संगितीमध्ये वरिष्ठ व महास्थविरांनी सूचना केल्याप्रमाणे संगायन करतांना प्रत्येकाने 'एवं मे सुतं' याच शब्दांनी सुरुवात करावी असे ठरवण्यात आले.

पाली भाषा ही एक स्वतंत्र भाषा असून एका दृष्टीने ती वैदिक व संस्कृत भाषेला जवळची आहे. तिची रचना आणि व्याकरण स्वतंत्र आहे. जाणकारांना व जिज्ञासू अभ्यासकांना थोड्या प्रयत्नांनीसुद्धा ती सहजपणे शिकता येते. संस्कृत व पाली भाषेत व्याकरणात काही फरक आहेत. उदा., संस्कृतमध्ये एकवचन, द्विवचन, बहुवचन आहे असे तीन वचने असून पालिमध्ये मात्र मराठी भाषेप्रमाणेच एकवचन आणि अनेकवचन अशी दोन वचने आहेत. यात द्विवचने नाहीत. संस्कृतमध्ये न आढळणारा 'ळ' हा वर्ण पाली भाषेमध्ये आढळतो. संस्कृतमध्ये जसे परस्मैपद आणि आत्मनेपद आहेत तसेच पाली मध्येही आहेत. पाली भाषेत संधीचे नियम असून ते संस्कृतइतके निश्चित नाहीत. बरेच ठिकाणी उच्चार सुकर होण्यासाठी संधीचे नियम शिथील करण्यात आले आहेत. संस्कृतमधील वर्णांचे परिवर्तन पालिमध्ये कोणत्या स्वरूपात होते हे एका स्वतंत्र परिशिष्टात दाखविले आहे.

पाली या शब्दाचा अर्थ हिंदी मधील 'पंक्ति' म्हणजेच मराठीमध्ये 'ओळ' किंवा 'रांग' असा होतो. धर्म ग्रंथातील ओळ किंवा रांग हा त्या शब्दाचा मूळ शब्द मानल्यास अशा प्रकारच्या धम्म ग्रंथाची भाषा म्हणून या भाषेस 'पाली' हे नामाभिधान प्राप्त झाले असावे. 'या पालेति बुद्धवचनं सा पालि ।' म्हणजे जी केवळ बुद्ध वचनाचे पालन करते, संगोपन करते आणि संवर्धन करते तीच पाली' असे भाषातज्ज्ञांचे मत आहे. पाली भाषेतील त्रिपिटकातील ग्रंथावर असणारी स्पष्टीकरणे आणि व्याख्या यांना 'अट्ठकथा' असे म्हणतात. याच भाषेला 'मागधी' असेही नाव असल्याचे सांगतात. मात्र 'मागधी' याच नावाने प्रसिद्ध असलेल्या प्राकृतभाषेपेक्षा पाली भाषा बरीच वेगळी आहे.

पालीचे मूळ रूप कोणते असावे या बाबत मतभेद पंडितांमध्ये दिसून येतो. प्राकृत व्याकरण ग्रंथात नोंदविलेल्या 'मागधी प्राकृत' या भाषेहूनही प्राचीन असणारी मगध देशातील 'मागधी' हे पालीचे मूळ असावी असा अनेकांचा कयास आहे. गौतम बुद्ध हे मूळ कोसल देशातील असल्याने 'कोसली' हेच पालीचे मूळ असावे असा अभिप्राय पाली भाषेतील शब्दांचा इंग्रजीतून अर्थ देणारे कोशकार ऱ्हिस डेव्हिस व स्टीड यांनी दिला आहे; पण 'कोसली'ची अशी स्वतंत्र वैशिष्ट्ये कोणत्याच व्याकरण ग्रंथात नोंदवलेली आढळत नाहीत. गौतम बुद्ध व महावीर हे प्रायः समकालीनच होते. दोघांनीही जनतेस कळावी अशी एकच बोली भाषा वापरली असावी. त्यामुळे जैनांची अर्धमागधी ही भाषा व गौतम बुद्धांची पाली भाषा ह्या एकमेकीस जवळच्या भाषा आहेत.

आज जगामध्ये बहुतेक ठिकाणी पाली भाषेचे अध्ययन-अध्यापन केले जात असले, तरी ती मूळ भारतीय भाषाच आहे व भारतीयांना ती सहज शिकता येते, हे तिचे वैशिष्ट्यच म्हणावे लागेल.

भारतीय संस्कृतीचा सर्वांग परिपूर्ण असा अभ्यास करावयाचा झाल्यास पाली भाषेची मदत घेणे आवश्यक ठरेल. अडीच हजार वर्षांपूर्वीची भारतीय जीवनप्रणाली, रूढी, राजनीती, समाजजीवन, धर्मपरंपरा, देशाची भौगोलिक स्थिती व सामाजिक नीतीमत्ता यांचे ज्ञान आपल्याला पाली भाषेतील त्रिपिटकाच्या अध्ययनाने प्राप्त होते. काव्य, शिल्प, धर्म, साहित्य, तत्त्वज्ञान इ. विविध क्षेत्रांत आमच्या पूर्वजांनी केलेली प्रगती नजरेसमोर येते.

आज पालिभाषा किंवा संस्कृतसारख्या इतर अभिजात भाषा प्रत्यक्ष बोलल्या जात नसल्या, तरी त्यांचे महत्त्व अबाधितच राहते. यासाठीच या भाषेचे अध्ययन-अध्यापन व संशोधन सतत चालू ठेवणे अगत्याचे ठरते. जगातील बौद्ध राष्ट्रे भारतभूमीला पूजनीय व पवित्र भूमी मानतात; कारण भगवान बुद्ध व बौद्धधर्म या पावन भूमीतच निर्माण झाले व विकास पावले. बौद्धधर्मीय राष्ट्रे बौद्ध तत्त्वज्ञान व धर्माचे माध्यम ठरलेल्या पालीभाषेला फार पवित्र मानतात. त्यांना पाली व सद्धर्माच्या माध्यमातून भारताशी अतिशय स्नेहपूर्ण मैत्रीचे संबंध ठेवता येतात. श्रीलंका, थायलंड, ब्रह्मदेश, नेपाळ, व्हिएतनाम, कंबोडिया इत्यादी बौद्ध राष्ट्रे याच अर्थाने आपली गुरूभूमी मानतात. युरोपातील अनेक देशांत पाली भाषेचे व बौद्ध साहित्याचे फार मोठ्या प्रमाणावर अध्ययन व संशोधन केले जात आहे.

एवढी उज्ज्वल परंपरा लाभलेल्या या पाली भाषेचे अध्ययन व्हावे म्हणून भारत सरकार व महाराष्ट्र शासन सतत प्रयत्नशील आहे. याचा सदृश्य पुरावा म्हणजे पालीसाठी महाराष्ट्र शासनाने पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाकडून निर्माण करून घेतलेले इयत्ता आठवीचे 'पालि पवेसिका' हे पुस्तक म्हणावे लागेल.

## संक्षिप्त संज्ञांचा खुलासा

| | | | |
|---|---|---|---|
| अ | - अव्यय | त्वा | - त्वान्त |
| ए. व. | - एक वचन | दु | - दुतिया (द्विवतीया) |
| अ. व. | - अनेक वचन | प. | - पठमा (प्रथमा) |
| क. वि. धा. वि | - कर्मणी विध्यर्थ धातुसाधित विशेषण | पु. | - पुल्लिंग |
| | | स्त्री. | - स्त्रीलिंग |
| कर्मणी भू. धा. वि | - कर्मणी भूतकाल-वाचक धातुसाधित विशेषण | नपुं. | - नपुंसकलिंग |
| | | पं. | - पञ्चमी |
| | | प्र. पु. | - प्रथम पुरुष |
| | | प्रयो. | - प्रयोजक |
| क्रि. | - क्रियापद | ब. व. | - बहुवचन |
| च | - चतुत्थी (चतुर्थी) | भू. | - भूतकाळ |
| छ | - छट्ठी (षष्ठी) | म्ह. | - म्हणजे |
| त | - ततिया (तृतीया) | वर्त. | - वर्तमानकाळ |
| तृ.पु. | - तृतीय पुरुष | वि. | - विशेषण |



पाठं पठति ।



गेहपाठं लिखति ।



बुद्धरूपं पस्सति ।



गानं गायति ।



बालको धावति ।



बालिका कीळति ।



बालको हसति ।



खीरं पिबति ।



भोजनं भुञ्जति ।


पठमो पाठो ।

# बालको, बालका ।


अयं बालको ।


इमे बालका ।


अयं सीहो ।


इमे सीहा ।


अयं कुक्कुटो ।


इमे कुक्कुटा ।


अयं सारमेयो ।


इमे सारमेया ।



एको चटको डेति ।



दुवे चटका डेन्ति ।



एका कञ्ञा कीळति ।



तिस्सो कञ्ञायो कीळन्ति ।



एको भमरो भमति ।



पञ्चा भमरा भमन्ति ।

## शब्दार्थ

इमे - हे अनेक

सारमेय (पु.) - कुत्रा

कञ्ञा (स्त्री.) - कन्या

डेति - उडते

भमन्ति - भ्रमण करतात

कुक्कुट (पु.) - कोंबडा

चटक (पु.) - चिमणा

भमर (पु.) भुंगा

कीळन्ति - खेळतात

## विवेचन

वरील वाक्ये वाचून त्या सोबतची चित्रे पाहिल्यास एक गोष्ट सहज समजून येईल पाली भाषेमध्ये एका वस्तूस एकवचन व एकापेक्षा जास्त वस्तूंना अनेकवचन (बहुवचन) असे म्हणतात. संस्कृत भाषेमध्ये एकवचन, द्विवचन व बहुवचन असे आहेत. इंग्रजी व मराठीमध्ये जसे एकवचन व अनेकवचन आहेत, त्याचप्रमाणे पाली भाषेत आहेत.

## अभ्यास

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) चिमण्या काय करतात ?

ब) मुली काय करतात ?

इ) भ्रमर किती आहेत ?

**२. कोणत्याही पाच शब्दांचे एकवचन देऊन अनेकवचन करा.**

दुतियो पाठो ।

# अहं आचरियं नमामि ।



अहं आचरियं नमामि ।
अहं विहारं गच्छामि ।
अहं पोत्थकं पठामि ।
अहं फलं खादामि ।
अहं बुद्धं वन्दामि ।


मयं आचरियं नमाम ।
मयं विहारं गच्छाम ।
मयं पोत्थकं पठाम ।
मयं फलं खादाम ।
मयं बुद्धं वन्दाम ।

## शब्दार्थ

अहं (प्र. पु. सर्वनाम) - मी
आचरिय (पु.) - आचार्य/शिक्षक
नमाम (प्र. पु. अ. व.) - आम्ही नमस्कार करतो.
गच्छाम (प्र. पु. अ. व.) - आम्ही जातो
पोत्थकं (नपु.) - पुस्तक
पठाम (प्र. पु अ. व) - आम्ही वाचतो.
खादाम (प्र. पु. अ. व.) - आम्ही खातो
वन्दामि (वन्द) - मी वंदन करतो.
मयं - आम्ही
नमामि (नम धातू) - नमस्कार करतो/करते
गच्छामि (मूळधातू गम/गच्छ) - मी जातो/जाते
पठामि (पठ) - मी वाचतो
फलं (नपु) - फळ
बुद्ध (पु.) - तथागत बुद्ध
वन्दाम (प्र. पु. अ. व.) - आम्ही वंदन करतो


## अभ्यास

१. पाठात आलेल्या एकवचनी व अनेकवचनी पाली क्रियापदांची यादी करा.
२. या क्रियापदांसारखेच आणखी काही क्रियापदे घेऊन दहा वाक्ये तयार करा.



तितियो पाठो ।

# आचरियो च बालको च ।




आचरियो - को त्वं बालको ?

बालको - अहं असोको नाम माणवको ।

आचरियो - असोक, किं तव हत्थे ?

बालको - आचरिय, मम हत्थे लेखणी ।

आचरियो - असोक, तव सम्पुण्ण नाम किं ?

बालको - आचरिय, मम सम्पुण्ण नाम असोको संघपालो सक्को ।

आचरियो - असोक, त्वं कुहिं वससि ?

बालको - आचरिय, अहं पुञ्ञपतने च सिद्धत्थनगरे वसामि च ।

आचरियो - त्वं किं पठसि ?

बालको - अहं पालिभासाय पोत्थकं पठामि ।

आचरियो - पालिभासा किदिसा होति ?

बालको - पालिभासा मधुरा होति ।

आचरियो - तव विज्जालयस्स नाम किं ?

बालको - आचरिय, मम विज्जालयस्स नाम तक्कसिला विज्जालयं अत्थि ।

## शब्दार्थ

आचरियो (पु.) – आचार्य

बालको (पु.) – मुलगा, विद्यार्थी

च (अ.) – आणि

माणवको (पु.) – विद्यार्थी, शिष्य

तक्कसिला (नाम) – तक्षशीला

सक्को (पु.) – शाक्य

कुहिं – कोठे

पुञ्ञपतने – पुण्य नगरी

किदिसा (किदृश) – कसे

## अभ्यास

१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. अशोक कोठे राहतो ?

२. पाली भाषा कशी आहे ?


३. विद्यालयाचे नाव काय आहे ?

२. रूपे ओळखा.

वसामि, वससि, पठसि, पठामि

## चतुत्थो पाठो ।

# मम पाठसाला ।



अम्हाकं नगरे एका पाठसाला अत्थि । पाठसालायं वत्थु अतीव मनोरमा अत्थि । पाठसालायं नाम सिद्धत्थ पाठसाला अत्थि । पाठसालाय मज्झे सत्त वग्गा सन्ति । पाठसालाय एको पमुखो अज्झापको अत्थि तथा अट्ठ सहअज्झापका सन्ति । मम पाठसालाय पञ्चसत बालका बालिका च पठन्ति । पाठसालाय मज्झे पोत्थकालयं अत्थि । तत्थ माणवका अज्झयनं करोन्ति । पाठसालायं समीपे एकं कीळागणं अपि अत्थि । तत्थ माणवका सायण्ह समये कीळन्ति ।

## शब्दार्थ

वत्थु - इमारत, वास्तू
वग्ग - वर्ग
अज्झापक - अध्यापक
समीप - जवळ
अपि - सुद्धा
अत्थि - आहे
पमुख - प्रमुख
माणवक - विद्यार्थी
कीळन्ति - खेळतात
पञ्चसत - पाचशे

## अभ्यास


**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. पाठशाळेचे नाव काय आहे ?
२. विद्यार्थी पुस्तके कोठे वाचतात ?
३. विद्यार्थी सायंकाळी कोठे खेळतात ?
४. तुमच्या शाळेचे पालीमध्ये वर्णन करा.



पञ्चमो पाठो ।

# उय्यानं ।



अम्हाकं नगरे एकं उय्यानं अत्थि । उय्याने विविधा रुक्खा सन्ति । रुक्खेसु बहवो सकुणा वसन्ति । सकुणा रुक्खेसु विविधानि फलानि खादन्ति । उय्याने एको तळाकोऽपि अत्थि । खगा च पसू च तळाके उदकं पिवन्ति । उय्यानस्स समीपे एका नदी अत्थि । उय्याने मालाकारो वसति । तस्स बालका उय्याने धावन्ति च कीळन्ति । सो पुप्फानि गहेत्वा नगरं गच्छति । अहो उय्यानस्स निम्मलता, अहो उय्यानस्स मनुञ्ञता ।

## शब्दार्थ

उय्यान - उद्यान, बाग, बगीचा
सन्ति - आहेत
पसू - पशू, जनावरे
पिवन्ति (पा-पिब) - पितात
मालाकारो - मालाकार, माळी
निम्मलता - निर्मळता, पावित्र्य
रुक्खा (अ.व.) - वृक्ष
खग - पक्षी
तळाक - तळे
समीप - जवळ
गहेत्वा (गण्ह) (त्वान्त अव्यय) - घेऊन
मनुञ्ञता - मनोरमणीयता

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. उद्यानाच्या जवळ काय आहे ?

२. मालाकार फुले घेऊन कोठे जातो ?

### ब) जोड्या जुळवा.

| 'अ' | 'ब' |
|---|---|
| १. उय्याने विविधा | १. विविधानि फलानि खादन्ति । |
| २. सकुणा रुक्खेसु | २. तळाकोऽपि अत्थि । |
| ३. उय्याने एको | ३. तळाके उदकं पिबन्ति । |
| | ४. रुक्खा सन्ति । |

### क) खालील नामाची रूपे ओळखा.


सकुणा, मालाकारो, उय्यानं, उय्यानस्स, रुक्खेसु, खगा

### ड) खालील क्रियापदांची रूपे ओळखा.

पठाम, नमसि, गच्छति, खादन्ति, वसति, धावन्ति, पठति

छट्ठो पाठो ।

# नीलं गगनं ।



नीलं गगनं । वत्थंऽपि नीलं ।

पीतं वसनं । सुवण्णंऽपि पीतं ।

रत्तं कमलं । रुधिरंऽपि रत्तं ।

उदयकाले सुरियोऽपि रत्तो ।


अत्थंगमनेऽपि सुरियो रत्तो एव ।

हंसो सेतो । खीरंऽपि सेतं ।

काको काळो । मेघोऽपि काळो ।

गजो महन्तो, ससको पन खुद्दको ।

पासाणो गरुको, तिणं पन लहुकं ।



यथा अम्बपक्कं मधुरं, तथा फाणितंऽपि मधुरं ।

किञ्चापि नदीजलं मधुरं, समुद्दो पन लोणरसो ।

तक्कं अम्बिलं पि होति, मधुरं पि होति ।



ओसधिरसो कसायो होति, मधु पन सादु' व होति ।

अङ्गारा तत्ता होन्ति, जलं पन सीतलं होति

## शब्दार्थ

**वत्थ** (नपुं.) - वस्त्र, कापड

**पीत** (वि.) - पिवळा

**वसन** (नपुं.) - नेसण्याचे वस्त्र

**सुवण्ण** (नपुं.) - सोने

**सुरिय** (पु.) - सूर्य

**अत्थ** (पु.) - अस्त 'अथ' ह्या शब्दाचेही पाली भाषेत 'अत्थ' असेच रूप होते.

**एव** (अ.) - च 'पाली'मध्ये 'एव' येव' किंवा केवळ 'व' अशी तीनही रूपे आढळतात.

**सेत** (वि.) - पांढरा

**काक** (पु.) - कावळा

**काळ** (वि.) - काळा

**गज** (पु.) - हत्ती

**महन्त** (वि.) - (आकाराने) - मोठा

**ससक** (पु.) - ससा

**पन** (अ.) - परंतु

**खुद्दक** (वि.) - छोटा, लहान

**पासाण** (पु.) दगड

**गरूक** (वि.) - वजनाने मोठा, जड

**तिण** (नपुं.) - गवत

**लहुक** (वि.) - हलका

**पि (अपि)** (अ.) - सुद्धा पाली भाषेत 'प' व 'अपि' अशी दोन्ही रूपे आढळतात

**रत्त** (वि.) - तांबडा

**रुधिर** (नपुं.) - रक्त

**अम्बपक्क** (नपुं.) - पिकलेला आंबा/ पिकलेले फळ सांगण्यासाठी पाली भाषेत 'पक्क' म्हणजे पक्व असा निर्देश करतात

**फाणित** (नपुं.) - काकवी, गुळाचा घट्ट पाक

किञ्चापि (अ.) - जरी

समुद्द (पं.) - समुद्र

लोण (नपुं.) - मीठ

लोणरस (वि.) - खारट, मिठाची चव असलेला

तक्क (नपुं.) - ताक

अम्बिल (वि.) - आंबट

ओसधि (स्त्री.) - औषधी, वनस्पती

कसाय (वि.) - तुरट

सादु (वि.) - गोड

'व (अ.) - प्रमाणे. पाली भाषेत संस्कृतातील 'इव' व 'एव' ह्या दोन्ही अव्ययांचे विकल्पाने 'व' हे रूप होते.

अङ्गार (पु.) - निखारा

तत्ता (वि.) - उष्ण, गरम, दाहक

सीतल (वि.) - थंड

## अभ्यास

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. सूर्य उगवताना आणि मावळताना कसा दिसतो ?

२. समुद्राच्या पाण्याची चव कशी आहे ?


३. औषधीची चव कशी आहे ?

### ब) पाली भाषेत विरुद्धार्थी शब्द लिहा.

उदयकाले, महन्तो, तत्ता, अम्बिल

सत्तमो पाठो ।

# तुम्हेहि दिट्ठं एकं गामं ।



कोरेगाव नाम गामं अतीव सुन्दरं अत्थि । गामं मज्झे एकं सहस्सानि गेहानि सन्ति । गामं मज्झे एकं विज्जालयं अत्थि । गामं मज्झे विविधानि रुक्खानि सन्ति । गामस्स मग्गानि अतीव खुद्दकानि सन्ति । गामस्स बहि भीमा नाम नदी वहति । गामवासी नहायितुं च वत्थानि धोवितुं च नदिं गच्छन्ति । नदी तीरे एको विजयत्थम्भो अत्थि । गामं मज्झे एकं दस्सनीय विहारं अत्थि । तत्थ बुद्धरूपं वन्दितुं उपासका च उपासिकायो च गच्छन्ति । एवं गामं अतीवं सुन्दरं अत्थि ।

## शब्दार्थ

सहस्सानि - सहस्त्र, हजार

खुद्दक - लहान

नहायितुं (तुमन्त) - स्नान करण्यासाठी

उपासक - उपासना करणारे, शिष्य, अनुयायी

गेह - घर

सन्ति - आहेत

बुद्धरूपं - मूर्ती

## अभ्यास

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. कोरे गावात काय काय आढळते ?

२. गावाच्या बाहेर कोणती नदी वाहते ?

३. नदीचा उपयोग ग्रामस्थ कशासाठी करतात ?

४. नदी तीरावर कोणता स्तंभ आहे ?

**ब) तुम्ही पाहिलेल्या गावाचे वर्णन पाली भाषेत पाच वाक्यांत करा.**



अट्ठमो पाठो ।

# सीलवतो आनिसंसा ।



एकस्मिं समये बुद्धो भगवा पाटलिगामे विहरति । बहवो गहपतियो भगवतो उपासका होन्ति । भगवा तेसं एवं धम्मं देसेति - ''गहट्ठेहि दानं दातब्बं, धम्मकथा सोतब्बा, कातब्बा च, सच्चं वत्तब्बं, सीलं रक्खितब्बं ।'' सीलवा नरो पञ्चविधं लाभं लभति । पठमं सो वायामेन सम्पत्ति च सब्बविधं सुखं च अधिगच्छति । सीलवतानं सब्बत्थं सुकित्ति होति, पसंसा च । सीलवन्ते खत्तियाऽपि ब्राह्मणाऽपि सब्बे मानेन्ति, यतो ते पूजनेया' व होन्ति । सीलवतो सुगती सुलभो होती । सीलवन्तो बहुसो मोहं न आपज्जन्ति, पमादं न कुब्बन्ति । सीलवन्तेसु धम्मो सुप्पतिट्ठितो

होती । पञ्ञावन्तेहि सीलवतो अनुकरणं कातब्बं । यथा सीलवा वत्तति तथा वत्तितब्बं । तेन तेऽपि यसं च कित्तिं च लभेय्युं'ति ।

एवं भगवतो देसनं सुत्वा सब्बे जना सन्तुट्ठा । ते हि च तस्स साधुकारो दिन्नो । अयं सीलदेसना अम्हेहिऽपि अनुसरितब्बा । तेन वयं भारतीया निस्संसयं लोके सुप्पतिट्ठिता होम ।

*(दीघनिकाय, महापरिनिब्बाणसुत्त; आवश्यक फेरफार करून)*

## शब्दार्थ

**सीलवन्त** (वि.) - नीतिवान, चारित्र्यसंपन्न

**आनिसंस** (पु.) - फायदा, गुण

**पाटलिगाम** (नपुं.) - पाटलीपुत्र नगर, पाटना शहर

**वि + हर (विहरति)** - राहणे, निवास करणे, संचार करणे

**बहु** (वि.) - पुष्कळ

**गहपति** (पु.) - गृहस्थ

**उपासक** (पु.) - अनुयायी

**धम्म** (पु.) - सदाचरणाचा मार्ग, कर्तव्य

**उप + दिस (उपदिसति)** - उपदेश करणे, शिकवणे

**गहट्ठ** (पु.) - गृहस्थाश्रमी

**दातब्ब** (वि.) - द्यावे

**धम्मकथा** (स्त्री.) - सदाचरणाच्या कथा

**सोतब्ब** (वि.) - ऐकावे

**कातब्ब** (वि.) - करावे

**सील** (नपुं.) - शील, नैतिक सदाचार, नितिमत्ता

**पञ्चविध** (वि.) - पाच प्रकारचा

**रक्खितब्ब** (वि.) - रक्षण करणे

**वायाम** (पु.) - प्रयत्न

**पसंसा** (स्त्री.) - स्तुती

**पमाद** - प्रमाद, हलगर्जीपणा, बेसावधपणा

**पञ्ञावन्त** (पु.) - प्रज्ञावान, बुद्धिमान, सुज्ञ

**वत-त्त** (वत्तति) - असणे, वागणे

**देसना** (स्त्री.) - उपदेश

**साधुकार** (पु.) - प्रशंसोद्गार, धन्यवाद, होकार

**अनुसरितब्ब** (वि.) - अनुसरावे

**सुप्पतिट्ठित** (वि.) - सुप्रतिष्ठित, दृढमूल

**पूजनेया** - पूजनीय, वंदनीय

## अभ्यास

**अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. भगवान बुद्ध कुठे राहत होते ?

२. भगवान बुद्धाने कोणाला उपदेश दिला ?

३. शीलवन्तास काय सुलभ होते ?

**ब) खालील प्रश्नांची पाली भाषेत उत्तरे लिहा.**

१. भगवतो गहपतिं किं धम्मं देसेति ?

२. सीलवा नरो किं लाभं लभति ?

### टीप

**पाटलीपुत्र** - ही काही काळ राजा बिम्बिसार राजाची व त्यानंतर काही काळ राजा सम्राट अशोकाची राजधानी होती. ही बिहार राज्याची आजही राजधानी असून हे शहर आज 'पाटणा' या नावाने ओळखले जाते. बुद्धाचा विहार (संचार) म्हणून या राज्याला बिहार असे म्हणतात.

नवमो पाठो ।

# अङ्कुत्तरसङ्गहो ।



एकं नाम किं ?

एकं मुखं । आकासं पि एकं ।

दुवे नाम किं ?



दुवे हत्था । पादाऽपि दुवे ।

तीणि नाम किं ?

तीणि सरणानि । अम्हाकं रट्ठधजस्स तयो वण्णा ।



चत्तारो नाम किं ?

चत्तारो अरियसच्चानि । दिसा च चतस्सो ।

पञ्च नाम किं ?

पञ्च सीलानि । पञ्च खन्धा सन्ति ।

छ नाम किं ?

छ आयतना सन्ति ? भमरस्स छ पादा ।

सत्त नाम किं ?

वज्जीनं सत्त अपरिहानिया धम्मा । इन्द्धनुनो वण्णा पि सत्त ।

अट्ठ नाम किं ?

अट्ठ अरियमग्गानि । अट्ठ दिसा उपदिसा च ।

नव नाम किं ?

सुरियादयो नव गहा । नवङ्ग सत्थुसासनं ।

दस नाम किं ?

दस सिक्खापदानि, पारमिता पि दस दस अङ्गुलियो ।

अम्हाकं हत्थेसु दस अङ्गुलियो ।

अथेकदा दस गामिका केनचिदेव करणीयेन नगरं गच्छन्ति । सायण्ह समये ते पुनऽपि गामं पच्चागच्छन्ति । अथ तेसं अञ्ञतरो एवं ब्रवीति । मयं दस जना नगरं गता, नव एव पन पच्चागता । अम्हाकं मज्झे यो दसमो सो कुहिं गतो ? अथ तेसं अञ्ञतरेन पुनऽपि गणना कता अयं पठमो, अयं दुतियो, अयं ततियो, अयं चतुत्थो अयं पञ्चमो, अयं छट्ठो, अयं सत्तमो, अयं अट्ठमो, अयं नवमो... दसमो पन न विज्जति । कमेन सब्बेहि अपि तेहि गणना कता । सा पन गणना नवमं नातिवत्तति । अनन्तरं कोचि विचक्खणो पुरिसो तत्थ आगच्छति पच्चेकस्स कण्णे एवं ब्रवीति ... 'यो दसमो, सो त्वं'ति । अधुना पन ते दस होन्ति । कथं ? पुब्बे सब्बेहि इतरे एव गणिता, अत्ता न गणितो । तेन ते नव होन्ति, न दस । अतो गणना समये पण्डितो पुरिसो अत्तानं पठमं गणेय्य ।

## शब्दार्थ

अङ्कुतर (सं अङ्कोत्तर) - एकेक आकड्याने चढत जाणे

एक (वि.) - संख्यावाचक शब्द

किं (सर्वनाम) - काय

मुख (नपुं.) - चेहरा, तोंड

हत्थ (पु.) - हात

रट्ठ (नपुं.) - राष्ट्र

आयतन - इंद्रिय

अथेकदा (अथ + एकदा) (क्रिवि.) - एकदा

केनचिदेव - कोणत्यातरी

करणीय (नपुं.) - काम

गणना (स्त्री.) - मोजणी

विचक्खण (वि.) - विचक्षण, शहाणा

सङ्गह - समुदाय

नाम (नपुं.) - नाम (वि.) नाव असणारा

सरणानि - अनुसरन, स्थाने - बुद्ध, धम्म व संघ हे त्रिशरण अनुसरन स्थाने आहेत.

आकास (पु.) - आकाश

पाद (पु.) - पाय, चरण

धज (पु.) - निशाण, ध्वज

पारमिता - सर्वोच्च कसोटी

गामिक (पु.) - ग्रामीण

अञ्ञ (सर्वनाम) - अन्य, दुसरा

ब्रू (ब्रवीति) (कि.) - बोलणे

मज्झे (अ.) - मध्ये

अतिवत्तति (अति + वत्त) - पलीकडे जाणे

पोस (पु.) - पुरुष

## अभ्यास

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. एक ते दहापर्यंत संख्यावाचक व क्रमवाचक शब्द पालीमध्ये लिहा.

२. चार आर्यसत्ये कोणती ?

३. आर्य आष्टांगिक मार्ग सांगा ?

४. दहा शिक्षापदे कुणासाठी आहेत ? ती कोणती ते सांगा.

५. दहा पारमिता कोणत्या आहेत ?

६. मोजतांना दहा माणसांऐवजी नऊ माणसेच का मोजली जात होती ?

## टीपा

१. **तीणिसरणानि (त्रिशरण)** - तीणि म्हणजे तीन व सरणानि म्हणजे अनुसरनस्थाने (शरणस्थाने) होय. भगवान बुद्धाच्या तत्वज्ञानामध्ये व धम्मामध्ये तीन अनुसरनस्थाने मानली जातात. यालाच त्रिशरण असे म्हणतात. त्रिशरण म्हणजेच बुद्ध, धम्म आणि संघ ही होत. बुद्ध म्हणजे सिद्धार्थ गौतम नावाचा ज्ञानी, विवेकी, विद्वान व आचरणाने संपन्न, सुगत, भगवान, अर्हत जगातील सर्व मानव प्राण्यामध्ये बुद्धिमान पुरुष जो इ. स. पूर्व सहाव्या शतकात आपल्या भारतात होऊन गेला. बुद्ध शब्दाचा दुसरा अर्थ असा आहे की प्रत्येक ज्ञानी, विवेकी, विद्या व आचरणाने संपन्न पुरुष हेच मानवाचे खरे शरणस्थान (श्रद्धास्थान) आहे, या शिवाय कोणतेही नाही.

धम्म म्हणजे अशा ज्ञानी सुगत पुरुषांनी सांगितलेले तत्वज्ञान सांगितलेले विचार त्यानुसार वागणे आणि आचरणात आणणे अर्थातच अनुसरन करणे होय.

संघ म्हणजे भगवान बुद्धाने स्थापन केलेला भिक्षू व भिक्षूणीचा संघ. हा संघ गावोगावी, खेड्यापाड्यात, देशविदेशात जाऊन बुद्धाच्या विचारांचा अर्थात धम्माचा प्रचार व प्रसार करीत असते. शिवाय बुद्धाच्या विचारांचे संरक्षण व संवर्धन करीत आहे.

२. **अरियसच्चानि (आर्यसत्ये)** - अरिय म्हणजे श्रेष्ठ या अर्थाने भगवान बुद्धाने हा शब्द वापरला आहे. 'सच्च' म्हणजे सत्य. भगवान बुद्धाने मानवी जीवनाची चार श्रेष्ठ सत्ये सांगितलेली आहे. यालाच आर्यसत्य किंवा त्रिकालाबाधीत सत्ये असेही म्हणतात : १.दुःख आर्यसत्य, २. दुःख समुदय (उत्पत्ति),

३. दुःख निरोध (नाश), ४. दुःखनिरोधगामिनी पटिपदा म्हणजे दुःख नष्ट करणारा मार्ग.

**३.आर्यअष्टांगिक मार्ग** – भगवान बुद्धाने मानवाच्या कल्याणासाठी दुःख मुक्तीचा मार्ग सांगितला आहे. दुःखाचे मूळ कारण हे तृष्णा असून तृष्णेवर विजय मिळविणे म्हणजेच दुःखापासून मुक्ती होय. या मुक्तीचा मार्ग हा आर्यअष्टांगिक मार्ग होय. ते पुढील प्रमाणे : १) सम्यक् दृष्टी, २) सम्यक् संकल्प, ३) सम्यक् वाचा, ४) सम्यक् कर्मान्त, ५) सम्यक् आजीविका, ६) सम्यक व्यायाम, ७) सम्यक स्मृति, ८) सम्यक समाधी

सम्यक् शब्दाचा अर्थ योग्य, परिपूर्ण असा आहे. या अष्टांगमार्गाचे तंतोतंत पालन केले असता खऱ्या अर्थाने दुःखमुक्त होता येते. यालाच मध्यम मार्ग असेही म्हणतात.

**४. पंचशील** - भगवान बुद्धाने शुद्ध व पवित्र आचरण यासाठी 'दहा शील' सांगितले आहेत. त्यातील पहिले पाच म्हणजे 'पंचशील' हे सर्वसामान्य स्त्री पुरुषासाठी म्हणजेच उपासक उपासिकासाठी आहेत. हे नियम पाळले असता व्यक्ती सदाचरणी म्हणून ओळखली जाते. ते पुढील : हिंसा करण्यापासून, चोरी करण्यापासून, अनैतिक वर्तनापासून, खोट्या बोलण्यापासून आणि दारू/मद्य अमली पदार्थ आणि प्रमादाची ठिकाणे या सर्वांपासून अलिप्त राहण्याची मी स्वतः प्रतिज्ञा घेत आहे.

**५. छ आयतने (सहा इंद्रिये)** - मानवी प्राण्याच्या शरीराला बाह्य गोष्टींचे ज्ञान होण्यासाठी सहा ज्ञानेंद्रिये आहेत : १) चक्षू (डोळे), २) श्रोत (कान), ३) घ्राण (नाक), ४) जिव्हा (जीभ), ५) काया (देह), ६) मन

**६. सत्त अपरिहानिया धम्मा** – म्हणजे मानवी समाजाला विनाशापासून वाचविणाऱ्या व सतत उन्नतीकडे नेणाऱ्या काही महत्वाच्या गोष्टी. बुद्धाने वज्जी लोकांना या सात महत्वपूर्ण गोष्टी सांगितल्या आहेत : १) निर्णय घेण्यासंबंधी सर्वांची एकत्र बैठक भरविणे, २) बैठकीत सर्वानुमते एकमताने निर्णय घेणे, ३) समाजमान्य व समाजानुकूल कार्य करणे, ४) वृद्धांचा सन्मान राखणे, ५) स्त्रियांशी सन्मानाने वागणे, ६) श्रद्धास्थानांचा नाश न करणे, ७) अर्हत म्हणजेच आदरणीय व्यक्तींचे संरक्षण करणे.

**७. दसपारमिता** - म्हणजे मानवाला पूर्णत्वाला नेणाऱ्या दहा गोष्टी. बुद्धाने दहा पारमिता सांगितल्या आहेत : १) दान पारमिता, २) शील पारमिता, ३) नैष्क्रम्य पारमिता, ४) प्रज्ञा पारमिता, ५) वीर्य पारमिता, ६) क्षांति (क्षमा) पारमिता, ७) सत्य पारमिता, ८) अधिष्ठान पारमिता, ९) मैत्री पारमिता, १०) उपेक्षा (समभाव) पारमिता

दसमो पाठो ।

# बालं न सेवे ।



(मूर्खांची सोबत हानिकारक असते, म्हणून शहाण्याची सोबत करावी. मूर्खांची संगत करू नये, हाच बोध या कथेतून मिळतो.)

अतीते किर एकस्स सेट्ठिपुत्तस्स एका रोहिणी नाम दासी अहोसि । तस्सा माताऽपि तस्स सेठिपुत्तस्सेव दासी अहोसि । एकदा रोहिणीमाता सेट्ठिगेहे वीहिप्पहरणठ्ठाने निसिन्ना होति; रोहिणी च मुसलेन वीहिप्पहरणं करोति ।

अथ एका मक्खिका मातुपिट्ठियं निसिन्ना तं विज्झति । माता दुहितरं आह -'अम्म, एसा मक्खिका मं विज्झति, तं वारेहि' ति । दुहिता 'मारेस्सामि, माता, ति वत्वा अत्तनोहत्थगतेन मुसलेन तं सहसा पहरति । तेनप्पहारेन रोहिणिया माता तत्थे व पबाळ्हाय वेदनाय मुच्छिता पतति । अथ रोहिणी

तं ञत्वा उच्चस्सरेन रोदति । तस्सा रोदनस्सरं सुत्वा सेट्ठिपुत्तो तत्थ आगच्छति । किं पवत्तं 'ति च पुच्छति । मन्दबुद्धिया दुहितरा मक्खिकं निवारेतुं मातरि मुसलप्पहारो दिन्नो 'ति ञत्वा सेट्ठिपुत्तो दुक्खितो एवं चिन्तेति 'मित्तोऽपि अमित्तोऽपि इमस्मिं लोके पण्डितो' व सेय्यो 'ति । चिन्तेत्वा इमं गाथं आह -

'सेय्यो अमित्तो मेधावी
यं चे बालानुकम्पको ।
पस्स रोहिणिकं जम्मि
मातरं हन्त्वान सोचती' ति ।

*(रोहिणी जातक क्र. ४५ आवश्यक फेरफार करून तयार करण्यात आला.)*

## शब्दार्थ

सेट्ठिपुत्त (पु.) - व्यापाऱ्याचा मुलगा
वीहि (पु.) - साळी, धान, तांदूळ
पहरण (नपुं.) - प्रहार करणे, कांडणे
निसन्न (वि.) - बसली
मुसल (नपुं.) - मुसळ
विज्झ (विज्झति) - चावणे, टोचणे, दंश करणे
मक्खिका (स्त्री.) - माशी
दुहिता (स्त्री.) मुलगी, कन्या
पिट्ठ - पाठ
अम्म (अ.) (स्त्री.) - संबोधन
अम्म ! - अगं मुली
वार (वारेति) - प्रतिबंध करणे, हकालणे
हत्थगत (वि.) - हातातील
प + हार (पहरति) - प्रहार करणे
पहार - आघात, तडाखा
ञत्वा (अ.) - जाणून
उच्चस्सर (पु.) - मोठा आवाज
रुद (रुदति) - रडणे
रोदनस्सर (पु.) - रडण्याचा आवाज
पवत्त (वि.) - घटना, घडलेला प्रसंग
मन्द बुद्धि (वि.) - मूर्ख
निवारेतुं (अ.) - हकालण्यासाठी
दुक्खित (वि.) - दुःखी झालेला
अमित्त (पु.) - अमित्र, शत्रू
सेय्य (वि.) - अधिक चांगला

अनुकम्पक (वि.) - सद्भाव करणारा, कृपाळू मित्र
जम्मि (स्त्री. वि.) - दुष्ट
हन्त्वान - प्रहार करून
सुच (सोचति) - शोक करणे
मुच्छित (वि.) - मूर्च्छित, बेशुद्ध
सेव (सेवति) - सहवासात राहणे


## अभ्यास

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. रोहिणी काय करीत होती ?
२. रोहिणीच्या आईने तिला काय सांगितले ?
३. रोहिणीने आपल्या आईच्या पाठीवरची माशी कशी हाकलली / उडवली ?
४. कोणाची सोबत करू नये ?

एकादसमो पाठो ।

# बिम्बिसारो च सिद्धत्थो - च ।



बिम्बिसारो - भन्ते, को त्वं ?

सिद्धत्थो - अहं सिद्धत्थो ।

बिम्बिसारो - सिद्धत्थो, त्वं कस्स पुत्तो ?

सिद्धत्थो - महाराज, अहं सुद्धोदनस्स पुत्तो ।

बिम्बिसारो - एवं । सुद्धोदनो नाम नराधिपो । त्वं नराधिपस्स सुतो । अहंऽपि नराधिपो येव । त्वं काळकेसो, सुखुमालो, भद्देन योब्बनेन सम्पन्नो । त्वं कुहिं गच्छसि ?

सिद्धत्थो - साकियानं कुला पब्बजितोऽहं । बुद्धो भवितुं इच्छामि । ञाणं लभितुं पब्बतं च गच्छामि ।

बिम्बिसारो - तुवं दानिं तरुणो च सुरो च खत्तियो चासि । मम सेनाधिपो भवितुमरहसि ।

सिद्धत्थो - न रज्जे मे रञ्जति मनो । अहं पधानाय गच्छामि; निब्बाणं च अधिगच्छामि ।

## शब्दार्थ

को (पु.) - कोण

मम/मे - माझा/माझी/माझे

त्वं/तुव (सर्वनाम) - तू

तव - तुझा/तुझी, तुझे

भन्ते - आदरदर्शक संबोधन, आपण, महाराज

पुत्त (पु.) - पुत्र, मुलगा

नराधिप (पु.) - राजा

काळकेस (वि.) - काळे केस असणारा तरुण

सुखुमाल (वि.) - सुकुमार

लभितुं (लभ' धातू तुमन्त अव्यय) - मिळविण्यासाठी

सम्पन्न (वि.) - युक्त

कुहिं (अ.) - काठे

पब्बजित (प्रव्रजित)(वि.) - घर सोडून बाहेर पडलेला

बुद्ध (वि.) - ज्ञानी

पब्बत (पु.) - डोंगर, पर्वत

दानिं (अ.) (सं) - आता

सूर (वि.) - शूर

खत्तिय (पु.) - क्षत्रिय

सेनाधिप (पु.) - सेनापती

भवितुमरहसि - तू व्हावेस, तू होणे हे योग्य आहे.

रज - रञ्जति (क्रि.) - रंगून जाणे, रमणे

रज्ज (नपुं.) - राज्य

भद्द (वि.) - योग्य, चांगले

पधान (नपुं.) - ध्यानासाठी झटण्याची क्रिया, समाधी

अधिगच्छति (अधि + गम/गच्छ) (क्रि.) - मिळवणे, प्राप्त करणे

## अभ्यास

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. सिद्‌धार्थ कोण होता ?

२. बिम्बिसाराने सिद्‌धार्थाला कोणती विनंती केली ? का ?

३. सिद्‌धार्थाने बिम्बिसाराला काय उत्तर दिले ?

## टीपा

१. **सिद्धत्थो** – म्हणजे सिद्धार्थ हा शुद्धोदन राजा व महामाया यांचा सुपुत्र होय. अर्थ सिद्ध करणारा तो सिद्धार्थ. हा सिद्धार्थ बालपणापासूनच विलक्षण बुद्धीचा असून तो प्रत्यक्षात विरक्त प्रवृत्तीचा होता. जीवनासंबंधी कामगार आणि पशुपक्षी यांच्याविषयी तो सतत चिंतनमग्न असायचा. हेच सिद्धार्थ पुढे बुद्धगयेला महत्प्रयासाने सम्बोधी प्राप्त करून बुद्ध झाले. आजही संपूर्ण विश्वामध्ये भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म चिरंतन आहे.

२. **बिम्बिसार** – इ. स. पूर्व सातव्या शतकातील शिशुनाग वंशाचा ५वा राजा बिम्बिसार होय. वयाच्या १५व्या वर्षी तो गादीवर बसला. राजा बिम्बिसार हा बौद्ध धम्माचा निष्ठावान उपासक असून बौद्धांचे सण व उत्सव मोठ्या प्रमाणात साजरे व्हावेत असे त्याने जाणीवपूर्वक प्रयत्न केले. तेव्हापासूनच 'उपोसथपर्व' सुरू झाले. हा बुद्धाचा समकालीन होता. इ. स. पूर्व ५४४ ते ४९३ या कालखंडात मगध देशावर त्याचे राज्य होते.

३. **शुद्धोदन** – पूर्वीच्या काळी जी सोळा गणराज्ये होती, त्यातील कपिलवस्तू या गणराज्याचा शुद्धोदन हा राजा होता. त्याकाळी गणराज्यांमध्ये लोकशाही अस्तित्वात होती. राजा शुद्धोदन आणि राणी महामाया यांच्या पोटी जो सुपुत्र जन्माला आला तो सिद्धार्थ; परंतु महामाया ही सिद्धार्थाच्या जन्मानंतर अल्पवधीतच मृत्यू पावली. त्यामुळे सिद्धार्थाचे पालनपोषण करण्यासाठी शुद्धोदन राजाने महामायेची बहीण महाप्रजापती गौतमी हिच्याशी विवाह केला आणि पुढे तिनेच सिद्धार्थाचे संगोपन केले.

४. **निर्वाण** – निब्बान म्हणजे निर्वाण. बौद्ध तत्वज्ञानातील परमोच्च ध्येय निर्वाण होय. राग (आसक्ती) द्वेष, मोह, मत्सर, लोभ इत्यादी षड्रिपुंवर विजय प्राप्त करणे म्हणजेच निर्वाण प्राप्त करणे होय.

५. **शाक्य** – सक्को किंवा साकिय म्हणजे शाक्य – प्राचीन भारतातील एक मोठा क्षत्रिय राजवंश. शक् या संस्कृत धातूशी संबंध जोडून 'सशक्त' किंवा 'शक्तिमान' असा त्याचा अर्थ सांगितला जातो. शाक्य, कोलिय, वज्जी इत्यादी राजकुळे प्रसिद्ध होती. राजा शुद्धोदन व राजपुत्र सिद्धार्थ हे शाक्यकुळातील होते.

पठमा पज्जपाठो ।

# सुजाता थेरी ।

अलङ्कता सुवसना, मालिनी चन्दनोक्खिता ।
सब्बाभरणसञ्छन्ना, दासीगणपुरक्खता ॥१॥

अन्नं पानं च आदाय, खज्जं भोज्जं अनप्पकं ।
गेहतो निक्खिमित्वान, उय्यानं अभिहारयि ॥२॥

तत्थ रमित्वा कीळित्वा, आगच्छन्ति सकं घरं ।
विहारं दट्ठुं पाविसि, साकेते अञ्जनं वनं ॥३॥

दिस्वान-लोकपज्जोतं, वन्दित्वान उपाविसिं ।
सो मे धम्मं च देसेसि, अनुकम्पाय चक्खुमा ॥४॥

सुत्वा च खो महेसिस्स, सच्चं सम्पटिविज्झहं ।
तत्थेव विरजं धम्मं, फुसयिं अमतं पदं ॥५॥

ततो सद्धमा विञ्ञाता, पब्बजिं अनगारियं ।
तिस्सो विज्जा अनुप्पता, अमोघं बुद्धसासनं 'ति ॥६॥

## शब्दार्थ

अलङ्कता (स्त्री.) - अलंकृत होऊन
सुवसना (स्त्री.) - सुंदर वस्त्र परिधान करून
सब्बाभरण (सब्बं + आभरण) - सर्व प्रकारचे दागिने
सञ्छन्ना (स्त्री.) - सजून, नटून
दासीगण (दासी + गण) - दासींचा समूह
अनुकम्पा (अनु + कम्पा) - दया, अनुकंपा
पुरक्खता (स्त्री.) - वेढवेली
आदाय (अ.) - घेऊन
अनप्पकं (वि.) - पुष्कळ
रमित्वा (रम) (त्वान्त अव्यय) - रममान होऊन

कीळित्वा - (किळ) - क्रीडा करून

विहार (पु.) - भिक्षूंचे निवासस्थान

दट्ठुं (अ.) पाहण्यासाठी

प + विस (क्रि.) - प्रवेश करणे

साकेत (नपुं.) - नगराचे नाव

मालिनी (स्त्री.) - माळा घालून, केस सजवून

चन्दनोक्खित (चन्दन + ओक्खित) (स्त्री.) - चंदनाचे उटणे लावून

दिस्वानं (दिस) (अ.) - पाहून

लोकपज्जोत (वि.) - लोकाला, जगाला उजळविणारा

दिस (देसेसि) (क्रि.) - उपदेश केला.

चक्खुमा (वि.) - चक्षुमान

सुत्वा (अ.) (सुण) (त्वान्त अव्यय) - ऐकून

महेसि (महा + इसि) - महान ऋषी, बुद्ध

फुस - प्राप्त केले

विञ्ञात (कृदन्त) - विज्ञान, ज्ञान, जाणले

अनगारियं - घरगृहस्थीचा त्याग करून

ति - तीन

विज्जा (स्त्री.) - विद्या, ज्ञान

अनुप्पत्ता - प्राप्त करून

अमोघ - मौल्यवान, व्यर्थ नसलेला

आगच्छन्ति (स्त्री.) - परत येताना

## अभ्यास

१) **खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

अ) उद्यानात जाताना सुजाता कशी गेली होती ?

ब) सुजाताला बुद्ध कोणत्या वनामध्ये विहार करीत असताना दिसले ?

क) सुजाताने बुद्धाला पाहून काय केले ?

२) **खालील शब्दांची स्त्रीलिंगी रूपे करा :**

गहपति, पुत्तो, भातो, उपासको, आचरियो, कुमारो

## टीपा

१. **साकेत** - बुद्धकालीन महानगरांपैकी कोसल प्रांताची राजधानी असलेले एक प्रसिद्ध नगर. बुद्धाची उपासिका विशाखाचे वडील धनंजय यांनी बुद्धकाळात हे नगर स्थापन केले. श्रावस्तीपासून साकेत सात योजन अंतरावर वसले होते. साकेत नगरालाच 'अयोध्या' असे म्हणतात.

२. **प्रव्रज्या** - ज्या व्यक्तीस प्रव्रज्या घ्यावयाची असेल त्याची प्रथम भगवान बुद्ध, त्यांचा धम्म आणि संघ यांवर श्रद्धा असायला हवी. त्याने भिक्षुकडे जाऊन प्रव्रज्येसंबंधी याचना करणे आवश्यक आहे. भिक्षू त्याच्या ज्ञानाची, बुद्धीची आणि श्रद्धेची चाचणी घेतात आणि त्याला प्रव्रज्या देण्याचा निर्णय करतात. प्रव्रज्या देताना नियमाप्रमाणे त्याचे मुंडण करून, त्याला काषाय वस्त्र परिधान करून दोन्हीही पायांवर उकिडवे बसवून दोन्ही हात जोडून, भिक्षुंना त्रिवार वंदन करवून भिक्षू देतील, त्या प्रमाणे त्रिसरण आणि दसशील ग्रहण करावयास लावून काही काळापुरते त्याला संघामध्ये प्रवेश दिला जातो. सर्वस्वाचा त्याग करून जो काषाय वस्त्र परिधान करतो ती प्रव्रज्या. या कालावधीत भिक्षू त्याच्या अध्ययन आणि आचरणाकडे लक्ष देतात व त्याने विनंती केली असता आणि भिक्षुंची खात्री पटली असता उपसंपदा देतात.

दुतियो पज्जपाठो ।

# मातङ्ग चरियं ।

प्रस्तावना : मातङ्ग नावाचे एक ऋषी बनारस येथे आले आणि जातिमा नावाच्या ब्राह्मण ऋषीकडे राहू लागले; परंतु मातङ्गऋषी चांडाळ असल्याचे कळताच त्यांनी त्याला वेगळे राहायला सांगितले. मातङ्ग खरे तर रात्रीच जाण्यासाठी निघाले. अंधारात दोनदा लाथ लागल्यामुळे तुझ्या मस्तकाचे सात तुकडे होतील असा (ब्राह्मण ऋषीने) शाप दिला. तेव्हा मातङ्ग ऋषीने त्याला कसे प्रतिउत्तर दिले ते या पाठात सांगितले आहे. हा पाठ 'चरिया पिटक' या ग्रंथातून घेतला आहे. 'शील' पारमितेच्या दृष्टीने हा पाठ महत्वाचा आहे.

पुनापरं यदा होमि जटिलो उग्गतापनो ।
मातङ्गो नाम नामेन सीलवा सुसमाहितो ॥१॥

अहञ्च ब्राह्मणो एको गङ्गाकूले वसामुभो ।
अहं वसामि उपरि, हेट्ठा वसति ब्राह्मणो ॥२॥

विचरन्तो अनुकूलम्हि उद्धं मे अस्समद्दस ।
तत्थ मं परिभासेत्वा अभिसपि मुद्धफालनं ॥३॥

यदिहं तस्स कुप्पेय्यं यदि सीलं न गोपये ।
अलोकेत्वानहं तस्स करेय्यं छारिकं विय ॥४॥

यं सो तदा मं अभिसपि कुपितो दुट्ठमानसो ।
तस्सेव मत्थके निपति योगेन तं पमोचयिं ॥५॥

अनुरक्खिं मम सीलं नारक्खिं मम जीवितं ।
सीलवा हि तदा आसिं बोधिया येव कारणा 'ति ॥६॥

## शब्दार्थ

जटिल (पुं.) – जटाधारी
उग्गतापन – उग्र तपस्या करणारा
सीलवा (पुं.) – शीलवान
सुसमाहित (वि.) – संयमी स्थिरवृत्तीचा
गङ्गाकूले (नपुं.) – गंगेचा काठी
वसामि (क्रि.) – राहत असे

उपरि (अ.) - वरती

हेट्ठा (अ.) - खाली

विचरन्त - विचरण करीत असताना

अनुकूल - काठाकाठाने

अस्सम (पु.) - आश्रम

अद्दस - दिस (दिस्सति भूत. तृ.पु.ए.व) - पाहिला

तत्थ (अ.) - तेथे

परिभासेत्वा - (परि + भास पूर्वकालवाचक) शिव्या देऊन

अभिसपि (क्रि.) - शाप दिला

मुद्धफालन - डोके फुटणे, मस्तकभंग

कुप्पेय्य - (कुप्प - कुप्पति विध्यर्थ) - रागावेन

छारिक (स्त्री.) - राख

विय (अ.) - प्रमाणे

दुटठमानस (पु.) - दुष्टमनाचा

मत्थक(नपुं.) - मस्तक, डोके

निपति (नि + पत भूत. तृ. पु. ए. व.) - पडले

पमोचयिं (प + मुच भूत. प्र.पु.ए.व.) - मी सुटका केली.

अनुरक्खि (अनु + रक्ख भूत. प्र. पु. ए.व.) - मी रक्षण केले

आसि (अस, अत्थ भूत. प्र. पु. ए. व.) - मी होतो

बोधि - बुद्धत्व, श्रेष्ठतम ज्ञान

## अभ्यास

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. मातङ्गाविषयीची माहिती लिहा.

२. जीवनाची पर्वा न करता त्यांनी शीलाचे रक्षण कसे केले ?

३. चरिया पिटकाचा थोडक्यात परिचय द्या.

## टीपा

**चरियापिटक** - चरिया म्हणजे प्रत्येक अवस्थेतील नीतिमय जीवन आचरण होय. 'मातङ्ग चरिय' हा पाठ 'चरिया पिटक' या लहानशा पण महत्त्वाच्या ग्रंथातून घेतला आहे. 'चरिया पिटक' हा ग्रंथ त्रिपिटकातील सुत्तपिटकात असलेल्या खुद्दकनिकायामध्ये आलेला आहे. या ग्रंथात ३५ चरियांचे अतिशय सुंदर व काव्यमय वर्णन असून जवळपास सर्व चरिया पद्यमय आहेत. या ग्रंथाची शैली पाली साहित्यात वैशिष्ट्यपूर्ण आहे.

# काया वाचा तथा मनसा संवरो ।

कायप्पकोपं रक्खेय्य, कायेन संवुतो सिया ।
कायदुच्चरितं हित्वा, कायेन सुचरितं चरे ॥१॥
वचीप्पकोपं रक्खेय्य, वाचाय संवुतो सिया ।
वचीदुच्चरितं हित्वा, वाचाय सुचरितं चरे ॥२॥
मनोप्पकोपं रक्खेय्य, मनसा संवुतो सिया ।
मनोदुच्चरितं हित्वा मनसा सुचरितं चरे ॥३॥
कायेन संवुता धीरा, अथो वाचाय संवुता ।
मनसा संवता धीरा ते वे सुपरिसंवुता ॥४॥
चक्खुना संवरो साधु, साधु सोतेन संवरो
घानेन संवरो साधु, साधु जिह्वाय संवरो ॥५॥
कायेन संवरो साधु, साधु वाचाय संवरो ।
मनसा संवरो साधु, साधु सब्बत्थ संवरो ॥
सब्बत्थ संवुतो भिक्खु, सब्बदुक्खा पमुच्चति ॥६॥

## शब्दार्थ

संवर (पु.) - संयम
कायप्पकोप - शरीराचा प्रकोप
रक्ख (रक्खति) (क्रि.) - रक्षण करणे
संवुत (कृदन्त) - संयमित
दुच्चरित (नपुं.) - वाईट आचारण
हित्वा (अ.) - त्याग करून, सोडून
सुचरित (नपुं.) - सदाचरण
चर (चरति) (क्रि.) - आचरण करणे
वचीप्पकोप - वाणीचा प्रकोप
मनोप्पकोपं - मनाचा प्रकोप

धीर - बुद्धिमान, मेधावी, धैर्यवान
चक्खु (पु.) - डोळा, चक्षू
सोत (पु.) - कान
घान (पु.) - नाक
जिव्हा (स्त्री.) - जीभ
सब्बत्थ - सर्वत्र
मुञ्च (पमुच्चति) - मुक्त होणे

## अभ्यास

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. या कवितेत आपणाला कोणता उपदेश केलेला आहे ?

२. भिक्षू सर्व दुःखांपासून कसा मुक्त होतो ?

३. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरा.

अ) कायदुच्चरितं ... (चरे, हित्वा)

ब) कायेन सुचरितं ... (हित्वा, चरे)

क) कायेन संवरो ... (साधु, असाधु)

चतुत्थो पज्जपाठो ।

## धम्मपदगाथासङ्गहो ।

आरोग्यपरमा लाभा संतुट्ठी परमं धनं ।
विस्सासपरमा ञाति निब्बाणं परमं सुखं ॥१॥

अप्पमादो अमतपदं पमादो मच्चुनो पदं ।
अप्पमत्ता न मीयन्ति ये पमत्ता यथा मता ॥२॥

याव जीवम्पि चे बालो, पण्डितं पयिरूपासति ।
न सो धम्मं विजानाति, दब्बी सूपरसं यथा ॥३॥

मुहुत्तमपि चे विञ्ञू पण्डितं पयिरूपासति ।
खिप्पं धम्मं विजानाति जिव्हा सूपरसं यथा ॥४॥

यो च गाथासतं भासे अनत्थपद संहिता ।
एकं धम्मपदं सेय्यो यं सुत्वा उपसम्मति ॥५॥

अचरित्वा ब्रह्मचरियं अलद्धा योब्बने धनं ।
जिण्णकोञ्चा 'व झायन्ति खीणमच्छे व पल्लले ॥६॥

नऽत्थि झानं अपञ्ञस्स पञ्ञा नऽत्थि अज्झायतो ।
यम्हि झानं च पञ्ञा च स वे निब्बाण सन्तिके ॥७॥

यो हवे दहरो भिक्खु युञ्जति बुद्धसासने ।
सो मं लोक पभासेति अब्भामुत्तो 'व चन्दिमा ॥८॥

यं हि कयिरा तं हि वदे, यं न कयिरा न तं वदे ।
अकरोन्तं भासमानं, परिजानन्ति पण्डिता ॥९॥

सब्ब पापस्स, अकरणं कुसलस्स उपसम्पदा ।
सचित्त परियोदपनं, एतं बुद्धानं सासनं ॥१०॥

## शब्दार्थ

**परमा** (वि.) - श्रेष्ठ, महान

**विस्सास** (नपुं.) - विश्वास

**अप्पमाद** (नपुं.) - सावधानता, दक्षता

**मच्चु** (पुं.) - मृत्यू

**ये** (सर्वनाम) - जे

**पयिरूपासति** (पयिर + उप + अस) - सेवा करणे

**विजानाति** - जाणतो (वि. + ञ) वर्तमानकाळ तृ. पु. ए. व.

**मुहुत्तमपि** (अ.)-मुहुत्तं + अपि)-क्षणभर

**गाथासतं** (गाथा + सतं) - शंभरगाथा

**सेय्यो** (अ.) - श्रेयस्कर

**सुत्वा** (सुण - पूर्वकालवाचक अव्यय) - ऐकून

**जिण्णकोञ्च** (पु.) (जिण्ण + कोञ्च) - वृद्ध क्रौंच पक्षी

**खीणमच्छ** (खीण + मच्छ) - मासे रहित

**निब्बाण** - निर्वाण

**अज्झायतो** (अ + झायतो) - ध्यान न करणारा

**यो** (पु.) - जो

**युञ्ज** (क्रि.) - लीन होणे

**मुत्त** (वि.) - मुक्त

**कयिरा** (तृ. विध्यर्थ तृ.पु. ए.व) - करावे

**अकोरोन्त** - न करता

**उपसम्पदा** - दीक्षा

**परियोदपनं** - नियंत्रित करणे

**संतुट्ठी** (स्त्री.) - संतोष, समाधान

**ञाति** (स्त्री.) - नातलग

**पमाद** (नपुं.) - बेसावधपणा, अविचारीपणा

**मीयन्ति** (क्रि.) - मरतात

**यावजीवम्पि** (यावजीवं + अपि) - जीव असे पर्यंत, जन्मभर

**दब्बी** (स्त्री.) - चमचा, पळी

**सूपरस** - सूप या पेयाची चव

**विञ्ञू** (पु.) - जाणणारा, ज्ञानी

**खिप्पं** - लवकर, लगेच

**अनत्थपद संहिता** (अनत्थ + पद + संहिता) - अनर्थपदाचा समूह

**सम** (क्रि.) - शांत होणे

**योब्बन** (नपुं.) - यौवन, तारुण्य

**झा** (क्रि.) - ध्यान, चिंता, काळजी करणे

**पल्लल** (नपुं.) - डबके, तलाव

**नऽत्थि** (न + अत्थि) - नाही, नसणे

**सन्तिके** (अ.) - जवळ

**दहरो** (पु.) - तरुण

**अब्भ** (पु.) - ढग, मेघ

चन्दिमा (पु.) - चंद्र

वदे (वद विध्यर्थ मृ. पु. ए. व.) - बोलावे, सांगावे

भासमानं - बोलणाऱ्याला

अकरणं - न करणे

कुसल - चांगले कार्य

सचित्त - स्वचित्त

सासनं - धम्म, नियम

## अभ्यास

**खालील प्रश्नांची पालिभाषेत उत्तरे लिहा.**

१. पण्डितो को परिजानति ?

२. बुद्धस्स सासनं किं अत्थि ?

३. निब्बाणस्स सन्तिके को गच्छति ?

४. लोकं को पभासति ?

## टीप

**धम्मपद** - पाली त्रिपिटक साहित्यातील अतिशय महत्त्वाचा व सातत्याने नवीन नवीन विचारांची प्रेरणा देणारा लहानसा पण अत्यंत महान ग्रंथ 'धम्मपद' होय. सुत्तपिटकातील खुद्दकनिकायामध्ये असलेला दुसऱ्या क्रमांकाचा ग्रंथ आहे. तथागत भगवान बुद्धाने विविध ठिकाणी, विविध प्रसंगी, विविध लोकांना जो गाथारूपाने धम्मोपदेश दिला आहे तो धम्मपदामध्ये आलेला आहे. यामध्ये २६ वग्गो (विषय) असून ४२३ गाथा आहेत. मन, पाप, पुण्य, क्रोध, मोद इत्यादी विषयासंबंधी सुंदर सखोल, मार्मिक आणि उदाहरणासहित नैतिक मूल्ये स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे भिक्षू, अरहन्त आणि ब्राह्मण कोणास म्हणावे या संबंधीच्या आचार संहिताही बुद्धाने या ग्रंथात स्पष्ट केल्या आहेत. पाली साहित्याचा हा ग्रंथ वाङ्मयीनदृष्ट्या सर्वोत्कृष्ट नमुना होय. या धम्मपदाचे जगातील बहुतेक सर्व भाषांमध्ये असंख्य अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. यांतील प्रत्येक गाथा हा एक उत्तम सुविचार असून तो आदर्श जीवनाचा पाया घडवतो.

## परिशिष्ट १

# पाली वर्णमाला

## स्वर व व्यंजने

| उच्चार स्थान | वर्णाचा प्रकार | ऱ्हस्व स्वर | दीर्घ स्वर | कठोर व्यञ्जने | मृदू व्यञ्जने |
|---|---|---|---|---|---|
| १ कण्ठ | कण्ठय | अ | आ | क, ख | ग, घ, ङ, ह |
| २ तालु | तालव्य | इ | ई | च, छ | ज, झ, ञ, य |
| ३ मूर्धा | मूर्धन्य | – | – | ट, ठ | ड, ळ, ढ, ण, र |
| ४ दन्त | दन्त्य | – | – | त, थ, स | द, ध, न, ल |
| ५ ओष्ठ | ओष्ठ्य | उ | ऊ | प, फ | ब, भ, म |
| कण्ठ व तालु | कण्ठ्य तालव्य | – | ए | – | – |
| कण्ठ ओष्ठ | कण्ठय ओष्ठ्य | – | ओ | – | – |
| दन्त व ओष्ठ | दन्त्य ओष्ठ्य | – | – | – | व |

वरील तक्त्यावरून पुढील गोष्टी दिसून येतात :

१. पाली भाषेत संस्कृतातील ऋ, ॠ, ऌ, ऐ व औ हे पाच स्वर आढळत नाहीत.

२. संस्कृत भाषेमध्ये स्वरानंतर विसर्ग येतो. अशा प्रकारचा विसर्ग पाली भाषेत आढळत नाही.

३. संस्कृत भाषेतील श व ष ही दोन व्यञ्जने पाली भाषेत आढळत नाहीत. त्याऐवजी पाली भाषेत केवळ 'स' हे व्यञ्जनच राहते.

४. अभिजात संस्कृत भाषेतील न आढळणारा पण मराठी भाषेत आढळणारा 'ळ' हा ध्वनी पाली भाषेत आढळतो.

# वर्णविचार - परिशिष्ट २ 'अ'

आपल्या मुखातून जे मूळचे ध्वनि निघतात त्यांना वर्ण म्हणतात पाली भाषेत एकूण ४० वर्ण आहेत.

सरा (स्वर)

ज्या वर्णाचा उच्चार स्वतंत्रपणे म्हणजे दुसऱ्या वर्णाच्या साहाय्यावाचून होतो त्याला 'स्वर' म्हणतात.

पाली भाषेत ८ स्वर आहेत.

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ओ.

**टीप** - स्वर - अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ओ (ऱ्हस्व), ए, ओ (दीर्घ), असे एकूण दहा स्वर. दोन दोन स्वरांच्या एका जोडीला सवण्ण म्हणतात. या प्रत्येक जोडीतील पूर्व अक्षर ऱ्हस्व असते व दुसरे दीर्घ असते जसे - अ, इ, उ, ए, ओ हे स्वर (ऱ्हस्व) आहेत.

ए आणि ओ हे ऱ्हस्व आणि दीर्घ या दोन्हींमध्ये मोजल्यामुळे ते दहा होतात.

१. संस्कृतमधील ऋ, ॠ, लृ, ऐ, औ, अः हे स्वर पालि भाषेत आढळत नाहीत.

ऋ बद्दल काही ठिकाणी 'अ' काही ठिकाणी 'इ' आणि काही ठिकाणी 'उ' होतो.

ऋ - अ = मृत - मत, कृषि - कसि, कृत - कत, घृत - घत, नृत्य - नच्च

ऋ - इ - ऋण - इण, तृणं - तिणं, ऋषि - इसि, श्रृंग - सिंग, कृत्य - किच्च

ऋ - उ - ऋतु - उतु, मृदु - मुदु, ऋजु - उजु, ऋषभ - उसभ, वृष्टि - वुट्ठि

२. लृ - संस्कृतात फारच क्वचितच ठिकाणी आढळतात.

३. ऐ बद्दल ए होतो- ऐरावण - एरावण, वैमानिक - वेमानिक

ऐ - इ - एश्वर्यम - इस्सरियं, सैंधव - सिंधवी

४. 'औ' च्या जागी सर्वसाधारणपणे 'ओ' होतो.

औ - ओ - पौर - पोरो, औदारिक - ओदरिको, दौवारिको - दो दोवारिको गौतम - गोतम

औ - आ - गौरव - गारव

औ - उ - मौक्तिकं - मुत्तिकं, औद्धत्व - उद्धच्च, औत्सुक्यं - उस्सुक्कं

# परिशिष्ट २ 'ब'

## व्यञ्जने

ज्या वर्णाचा उच्चार स्वरांचे मागून साह्य घेऊन होतो त्यांना व्यंजने म्हणतात. व्यंजने खालील प्रमाणे ३२ आहेत

क वर्ग - क ख ग घ ङ्

च वर्ग - च छ ज झ ञ

ट वर्ग - ट ठ ड ढ ण

त वर्ग - त थ द ध न

प वर्ग - प फ ब भ म य र ल व स ह ळ

१) पालीमध्ये श आणि ष उपयोगात आणला जात नाही. त्याऐवजी स चा उपयोग केला जातो.

उदा. आकाश - आकास शशः - ससो, शेष - सेस, पुरिष - पुरिसो शिष्य - सिस्सो, शील - सील, शीर्ष - सीस

२) पालीमध्ये कोणतेही पद हलन्त (व्यंजनात) नसते. अशा अन्त्य व्यंजनाचा लोप केला जातो.

उदा. भगवा (न्)-भगवा, गुणवा (न्) - गुणवा

याव (त्)-याव, ताव, विद्यु (त्) विज्जु, पश्चा (त) - पच्छा

३) पाली भाषेत अन्त्य 'म' च्या स्थानी नेहमी अनुस्वार असतो. उदा. चित्तम् - चित्तं, सत्यम - सच्चं, तीर्थम् - तित्थं

४) पालीमध्ये विसर्गाचा (:) लोप झाला आहे. संस्कृतातील अकारान्त पदाच्या शेवटी जो विसर्ग असतो त्याच्या जागी पालिमध्ये 'ओ' होतो. इतर ठिकाणी विसर्गाचा अभाव असतो.

उदा., - बुद्धः - बद्धो, कः - को, एषः - एसो, भिक्षुः - भिक्खु

अग्निः - अग्गि

५) विसर्गाच्या पुढे जर स, श, ष असेल तर विसर्गाच्या स्थानी 'स' होतो उदा., - दुःसह - दुस्सहो, निःशोक - निस्सोको

६) पालीमध्ये रेफ (रफार 'र्' ) चा अभाव आहे. कुठे कुठे रेफचा लोप होतो तर कुठे त्याच्याऐवजी 'र' होतो.

उदा., - कर्म - कम्म, धर्म - धम्म, सर्वः - सब्बो, निर्जलः - निज्जलो, तर्हि - तरहि, आर्य - अरिय, सूर्य - सुरिय भार्या - भरिया, प्रेम - पेम

७) संयुक्त वर्णाच्या पूर्वी असलेला दीर्घ स्वर ऱ्हस्व होतो.

उदा. - मार्दव - मद्दवं, तीर्थ - तित्थं, धार्मिक - धम्मिको

८) पदातील आदि क्ष चा ख होतो.

उदा., क्षीरं - खीरं, क्षेमः - खेमो

९) पदातील मध्य 'क्ष' चा काही ठिकाणी 'क्ख' तर काही ठिकाणी 'च्छ' होतो.

उदा., - दक्षिण - दक्खिणो, मोक्ष - मोक्खो, पक्ष - पच्छो, असि - अच्छि, अक्खि

१०) पदातील आदि 'द्य' चा ज आणि मध्य 'द्य' 'ज्ज' होतो.

उदा., द्युति - जुति, अद्य - अज्ज, विद्यते - विज्जते

११) पदातील आदि 'ध्य' चा 'झ' होतो आणि मध्य 'ध्य' चा 'ज्झ' होतो.

उदा., ध्यानं - झानं, बुध्यते -बुज्झते

१२) पदातील आदि 'त्य' चा 'च' होतो आणि मध्य 'त्य' चा च्च होतो.

उदा., - त्यजति - चजति, त्याग - चाग, प्रत्यय - पच्चयो, नृत्यं - नच्चं, सत्यं - सच्चं

१३) पदातील आदि 'ज्ञ' चा 'ञ' आणि ज्ञ चा 'ञ्ञ' होतो.

उदा., - ज्ञाति - ञाति, ज्ञानं - ञाणं, संज्ञा - सञ्ञा, प्रज्ञा - पञ्ञा

१४) पदातील 'न्य' आणि ण्य चा 'ञ्ञ' होतो.

उदा., धान्य - धञ्ञं, शून्य - सूञ्ञं, हिरण्य - हिरञ्ञ

१५) पदातील 'ष्ट' व ष्ठ च्या स्थानी 'ट्ठ' आणि 'स्त' च्या स्थानी 'थ' किंवा त्थ किंवा त्त होतो.

उदा., - तुष्ट - तुट्ठो, षष्ठ - छट्ठो, स्तम्भ-थम्भो, हस्ती - हत्थी दुस्तरं - दुत्तरो.

१६) ड, ढ चा अनुक्रमे 'ल' किंवा 'ळ्ह' होतो.

उदा., - दाडिम् - डाळिम, मूढ - मूळ्ह

१७) जोडाक्षरातील 'व' चा 'ब' होतो व त्याचे द्वित्व होतो

उदा., सर्व - सब्ब, पर्वत - पब्बत

१८) संस्कृत जोडाक्षरांचे पाली शब्दातील इतर काही बदल पुढील प्रमाणे आहेत :

| अ.क्र. | संस्कृत जोडाक्षर | शब्दारंभी | शब्दामध्ये |
|---|---|---|---|
| १) | त्य, ध्य, द्य, ध्य | च, छ, ज, झ | च्च, च्छ, ज्ज, ज्झ |
| | | त्याग - चाग | नृत्य - नच्च, मद्य - मज्ज |
| | | युति - जुति | मध्य - मज्झ, |
| | | ध्यान - झान | तथ्य - तच्छ |
| २) | स्त, स्थ, ष्ठ | थ, ट, ठ ट्ढ | |
| | | स्तुति - थुति, | गृहस्थ - गहट्ढ |
| | | स्थान - ठानं | काष्ठ - कट्ठ |
| ३) | श्च, प्स, त्स | - | च्छ |
| | | | आश्चर्य - अच्छरिय |
| | | | अप्सरा - अच्छरा |
| | | | वत्स - वच्छ |
| ४) | ष्क, स्क, क्ष | ख | क्ख |
| | | स्कन्ध - खन्ध | भिक्षु - भिक्खु |
| | | क्षान्ति - खन्ति | शुष्क - सुक्ख |
| ५) | क्ष | छ | च्छ |
| | | क्षुब्ध - छुद्ध | इक्षु - उच्छु |
| ६) | स्प, ष्प | फ | प्फ |
| | | स्पदन - फंदन | पुष्प - पुप्फ |

| अ.क्र. | संस्कृत जोडाक्षर | शब्दारंभी | शब्दामध्ये |
| --- | --- | --- | --- |
| ७) | न्य, ण्य ज्ञ | ञ | ञ्ञ |
| | | न्याय - ञाय | कन्या - कञ्ञा |
| | | | प्रज्ञा - पञ्ञा |
| | | | अरण्य - अरञ्ञ |
| ८) | ष्ण | - | ण्ह |
| | | | उष्ण - उण्ह |

# परिशिष्ट ३

## स्वरसंधी

दोन स्वर एकापुढे एक असे आल्यास ते एकामेकात मिळून जातात. पाली भाषेतील स्वरसंधी विषयीचे काही प्रमुख नियम पुढील प्रमाणे आहेत =

१) अ पासून उ पर्यंत स्वरापुढे सजातीय (म्ह. त्याच प्रकारचा) स्वर आल्यास त्या दोहोबद्दल एक दीर्घ स्वर येतो.

| प्रकार | उदाहरणे | संधी |
|---|---|---|
| अ + अ | पन + अयं | पनायं |
| आ + अ | पादा + अपि | पादापि |
| आ + आ | तण्हा + आकुला | तण्हाकुला |
| इ + इ | उपद्दुहन्ति + इति | उपद्दुहन्तीति |
| इ + ई | नहि + ईदिसो | नहीदिसो |
| उ + उ | बहु + उपकार | बहूपकार |
| उ + ऊ | बहु + ऊसहन | बहूसहन |

२) दोन पदांचा संधी होत असता क्वचित् पहिल्या पदाचा शेवटच्या स्वराचा लोप होतो. तर क्वचित् दुसऱ्या पदाच्या प्रारंभीच्या स्वराचा लोप होतो. ह्या प्रकारांना अनुक्रमे पूर्वलोप व परलोप असे म्हणतात. दुसऱ्या दृष्टिकोनातून सांगायचे झाले तर अशा प्रकारच्या संधी मध्ये क्वचित् उत्तर पदाच्या प्रारंभी असलेला स्वर राहतो. या दृष्टिकोनातून या संधींना अनुक्रमे पूर्वरूप संधी व पररूप संधी असे म्हणतात.

उदा., पूर्वरूप संधी - रुक्खो + अपि ( = ओ + अ) = रुक्खोपि,

देवो + अम्हि = देवोम्हि

पररूप संधी - निलानि+एकानि = नीलानेकानि, न+एव = (अ+ए) = नेव

३) कोणत्याही विजातीय स्वरानंतर किंवा अनुस्वारानंतर 'इति' हा शब्द आल्यास त्यातील 'इ' चा लोप होतो.

उदा., सुक्को + इति = सुक्को ति ।

सो + इति = सो ति ।

सब्बेसं + इति = सब्बेसं ति ।

करिस्स + इति = करिस्स ति ।

इति मधील 'इ' चा लोप अवग्रह चिह्न (ऽ) किंवा -' अशा प्रकारे शीर्ष रेखेत चिह्न वापरून दाखवतात. क्वचित कोणतेच चिह्न वापरात येत नाही; परंतु वरील प्रमाणे इति मधील 'इ' चा लोप होत असताना त्या 'इति' च्या आधी जर ऱ्हस्व स्वर येत असेल तर तो दीर्घ होतो.

उदा., गच्छाम + इति = गच्छामी ति ।

वदतु + इति = वदतू ति ।

# परिशिष्ट ४

## नामरूपावली

### 'बुद्ध' अकारान्त पुल्लिंग

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | बुद्धो | बुद्धा |
| दुतिया | बुद्धं | बुद्धे |
| ततिया | बुद्धेन | बुद्धेहि, बुद्धेभि |
| चतुत्थी | बुद्धाय, बुद्धस्स | बुद्धानं |
| पञ्चमी | बुद्धा, बुद्धस्मा, बुद्धम्हा | बुद्धेहि, बुद्धेभि |
| छट्ठी | बुद्धस्स | बुद्धानं |
| सत्तमी | बुद्धे, बुद्धस्मिं, बुद्धम्हि | बुद्धेसु |
| आलपन (संबोधन) | बुद्ध, बुद्धा | बुद्धा |

पुत्त, रुक्ख धम्म, बालक इत्यादी रूपे 'बुद्ध' अकारान्त पुल्लिंग या प्रमाणे चालतात.

### 'पितु' उकारान्त पुल्लिंग

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | पिता | पितरो |
| दुतिया | पितरं, पितुं | पितरो |
| ततिया | पितरा, पितुना | पितरेहि, पितरेभि |
| चतुत्थी | पितु, पितुनो, पितुस्स | पितरानं, पितानं, पितूनं |
| पञ्चमी | पितरा | पितरेहि, पितरेभि, पितूहि पितुभि |
| छट्ठी | पितु, पितुनो, पितुस्स | पितरानं, पितानं, पितूनं |
| सत्तमी | पितरि | पितरेयु, पितूसु |
| आलपन (संबोधन) | पित, पिता | पितरो |

भिक्खू, गुरू, भानु इत्यादी शब्द 'पितु' प्रमाणे चालतात.

## 'माला' आकारान्तं स्त्रीलिंग

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | माला | माला, मालायो |
| दुतिया | मालं | माला, मालायो |
| ततिया | मालाय | मालाहि, मालाभि |
| चतुत्थी | मालाय | मालानं |
| पञ्चमी | मालाय | मालाहि, मालाभि |
| छट्ठी | मालाय | मालानं |
| सत्तमी | मालाय, मालायं | मालासु |
| आलपन (संबोधन) | माले | माला, मालायो |

सुजाता, विमला, मेत्ता, विशाखा, इत्यादी माला प्रमाणे चालतात.

## 'फल' अकारान्त नपुसकलिंग

| विभत्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | फलं | फला, फलानि |
| दुतिया | फलं | फला, फलानि |
| ततिया | फलेन | फलेहि, फलेभि |
| चतुत्थी | फलाय, फलस्स | फलानं |
| पञ्चमी | फला, फलस्मा, फलम्हा | फलेहि, फलेभि |
| छट्ठी | फलस्स | फलानं |
| सत्तमी | फले, फलस्मिं, फलम्हि | फलेसु |
| आलपन (संबोधन) | फल | फला, फलानि |

वन, धन, गाम, पाप, उदक, सील, उय्यान, इत्यादी शब्द 'फल' या शब्दा प्रमाणे चालतात.

# सर्वनाम

## प्रथम पुरुष वाचक सर्वनाम, 'अम्ह'

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | अहं | मयं, अम्हे, नो |
| दुतिया | मं, मम | अम्हाकं, अम्हे, नो |
| ततिया, पञ्चमी | मया, मे | अम्हेहि, भि, नो |
| चतुत्थी, छट्ठी | मम, मय्हं, ममं, मे | अम्हं, अम्हाकं, अस्माकं, नो |
| सत्तमी | मयि | अम्हेसु |

## द्वितीय पुरुष वाचक सर्वनाम - 'तुम्ह'

| विभक्ती | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| पठमा | त्वं, तुवं | तुम्हे, वो |
| दुतिया | त्वं, तुवं, तं, तवं | तुम्हे, वो |
| ततिया, पञ्चमी | तया, त्वया, ते | तुम्हेहि, तुम्हेभि, वो |
| चतुत्थी, छट्ठी | तव, तुय्हं, तुम्हं, ते | तुम्हांक वो |
| सत्तमी | त्वयि, तयि | तुम्हेसु |

# परिशिष्ट ५

## धातुसाधित, विशेषणे व अव्यये

### १. कर्मणि भूतकालवाचक धातुसाधित, विशेषणे

दा - दिन्न, (दिलेले) कर - कत, वच - वुत्त, पूज, पूजित, ठा - ठित
पति + ट्ठा - पतिट्ठितं, सं + तुस - सन्तुट्ठ, गम - गत, नि + सिद - निसिन्न
प + क्खिप - पक्खित्त, दिस - दिट्ठ, परि + पुर - परिपुण्ण, भी - भीत
पत - पतित, मर - मत, चिन्त - चिन्तित, प + वत - पवत्त, आ + नी - आनीत
नस - नट्ठ, पठ - पठित

### २. कर्मणि विध्यर्थ धातुसाधित विशेषणे

दा - दातब्ब (द्यावयास पाहिजे) सु - सोतब्ब, कर - कातब्ब
रक्ख, - रक्खितब्ब, वत - वत्तितब्ब, पूज - पूजनीय, गम - गन्तब्ब
अनु + सर - अनुसरितब्ब

### ३. त्वान्त, ल्यबन्त अव्यये

दा - दत्वा (देऊन), सु - सुत्वा, कर - कत्वा, गम - गन्त्वा, वच - वत्वा
नि + सिद - निसीदित्वा, आ + गम - आगन्त्वा, दिस - दिस्वा, वस - वसित्वा
प + विस - पविसित्वा, नि + कम - निक्खमित्वा

पाली भाषेमध्ये 'त्वा' प्रमाणेच त्वान हा प्रत्यय लावूनही पूर्वकालवाचक धातुसाधित अव्यये तयार करता येतात.

### 'हेत्वर्थक' अव्यये (तुमन्ते)

दा - दातुं (देण्यासाठी), कर - कातुं, आ + गम - आगन्तुं, वच - वत्तुं
पिव - पिवितुं, आ + नी - आनेतुं, उप + सं + कम - उपसङ्कमितुं
अधि + गम - अधिगन्तु, सिक्ख - सिक्खितुं, अव + ओ + लोक - ओलोकेतुं
नि + कम - निक्खमितुं, वि + जि - विजेतुं

# परिशिष्ट ६

## धातुरूपावली

धातुरूपांविषयी काही माहिती -

१. पाली भाषेत दोन पद (प्रकार) आहेत. (१) परस्सपद (परस्मैपद) आणि (२) अत्तनोपद (आत्मनैपद)

प्रामुख्याने पालीमध्ये परस्सपदाचा उपयोग करण्यात येतो व अत्तनोपदाची रूपे कमी आढळतात. अत्तनोपद कर्मणि व कवितेत उपयोगात आणतात.

२. पाली व्याकरणात अनुक्रमे तीन पुरुष आहेत. पाली व मराठी व्याकरणातील पुरुषांमध्ये खालील प्रमाणे क्रम आहे :

| पालि | मराठी |
|---|---|
| उत्तम पुरिस | प्रथम पुरुष |
| मज्झिम पुरिस | द्वितीय पुरुष |
| पठम पुरिस | तृतीय पुरुष |

३. काळ व अर्थवाचक काही पालि - संज्ञा पुढील प्रमाणे

| | पाली | मराठी |
|---|---|---|
| १. | पच्चुपन्नकाल | वर्तमानकाळ |
| २. | हीय्यत्तनी | भूतकाळ |
| ३. | भविस्सन्ती/अनागतो | भविष्यकाळ |

### (पठ - बोलणे) वर्तमान कांळ (पच्चुप्पन्नकाळ)

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पठामि | पठाम |
| द्वितीय पुरुष | पठसि | पठथ |
| तृतीय पुरुष | पठति | पठन्ति |

### पठ 'धातु' भविष्यकाळ (भविस्सन्ती/अनागत काल)

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पठिस्सामि | पठिस्साम |
| द्वितीय पुरुष | पठिस्ससि | पठिस्सथ |
| तृतीय पुरुष | पठिस्सति | पठिस्सन्ति |

नम, गच्छ, खाद, वद, भव, इत्यादी धातु 'पठ' प्रमाणेच चालतात.

### पठ 'धातु' भूतकाळ (अतीतकाल/हिय्यत्तनी)

| पुरुष | एकवचन | अनेकवचन |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | पठिं | पठिम्ह |
| द्वितीय पुरुष | पठि | पठित्थ |
| तृतीय पुरुष | पठि | पठिंसु/पठुं |

नम, गच्छ, खाद, वस, कीळ, वद, कस, भुञ, इत्यादी धातु 'पठ' प्रमाणेच चालतात.

# परिशिष्ट ७

## संख्यावाचक व क्रमवाचक विशेषण

१. एक
२. द्वि
३. ति
४. चतु
५. पञ्च
६. छ
७. सत्त
८. अट्ठ
९. नव
१०. दस
११. एकादस
१२. द्वादस, बारस
१३. तेरस, तेळस
१४. चतुद्दस, चुद्दस
१५. पञ्चदस, पण्णरस
१६. सोळस
१७. सत्तदस, सत्तरस
१८. अट्ठदस, अट्ठारस
१९. एकूनवीसति, एकूनवीस
२०. वीसति, वीसा

### क्रमवाचक विशेषणे

पठम, दुतिय, ततिय, चतुत्थ, पञ्चम, छट्ठ, सत्तम, अट्ठम, नवम, दसम

### पुरुषवाचक संख्या विशेषणे

पठमो, दुतियो, ततियो, चतुत्थो या प्रमाणे

### स्त्रीवाचक संख्या विशेषणे

पठमा, दुतिया, ततिया, चतुत्थी या प्रमाणे

अत्त दीप भव।

सच्चमेव जयते।

पञ्ञावन्ता सब्बत्थ पूजीता।

सब्बे अवेरा होन्तु।

विज्जादानं सब्बदानं जिनाति।

सीलवतो सब्बत्थ सुकित्ती होति।

जलं जीवनं होति।

रुक्खो मानवस्स पिय्यमित्तो।

सन्तुट्ठी परमंधनं।

विज्जा च विनयो च साभिमान च- एता मम गुरु।

विस्सास परमा ञाती।

आरोग्य परमा लाभा।

रुक्खा सप्पुरिसा इव होन्ति।

होतु मे जयमङ्गलं।

निब्बाणं परमं सुखं।

सब्बे सत्ता सुखी होन्तु।

भवतु सब्ब मङ्गलं।

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

रु. १५.००

